| (सीएनआर क्र. एमएचएसओ–२०००–०६५८–२०१०) | नियमित दिवाणी दावा क्र. १४२/२०१० |
|---|---|

## निशाण क्र. ९१ खालील आदेश

प्रस्तुतचा अर्ज वादींनी मयत प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड यांचे बाबत पारीत झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळणेसाठी दाखल केलेला आहे.

२. अर्जात वादींचे कथन असे आहे की, सदर दाव्याचे काम चालू असताना यातील प्रतिवादी क्र. ४ हरीराम पांडुरंग गायकवाड हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाले आहेत. सदर वादी हे आजारी असल्याकारणाने त्यांना मे. न्यायालयात येऊन वारस अभिलेखावर घेणेबाबतचा अर्ज मुदतीत देता आला नाही. त्यामूळे सदर दावा प्रतिवादी क्र. ४ चे वारसाबाबत अबेट झालेला आहे. त्यामूळे सदरचा दावा अबेटमेंट सेट असाईड होऊन मिळणेबाबत अर्ज दाखल करणे भाग पडले आहे. सदर अबेटमेंट सेट असाईड न झाल्यास वादींचे कधीही न भरुन येणार अपरिमीत असे नुकसान होणार आहे. सबब, प्रतिवादी क्र. ४ यांच्याविरुध्द झालेला दावा अबेटचा आदेश रद्द होवून मिळावा अशी वादींनी विनंती केलेली आहे.

३. सदरच्या अर्जास प्रतिवादी क्र. २ तर्फे म्हणणे देण्यात आले असून त्यात त्यांनी असे कथन केले आहे की, प्रस्तुतचा अर्ज खरा व कायदेशीर नाही. अर्जातील कारण खरे नाही. सबब अर्ज नामंजूर करण्यात यावा अशी त्यांनी विनंती केली आहे.

४. उभय पक्षाचा युक्तीवाद ऐकला. वादींनी प्रतिवादींविरुध्द सरस निरस मानाने वाटप होऊन मिळण्यासाठी दावा दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जात वादी यांनी ते आजारी असल्याकारणाने त्यांना मे. न्यायालयात येऊन वारस अभिलेखावर घेणेबाबतचा अर्ज मुदतीत देता आला नाही असे कारण नमूद केले आहे. सदर कथनाच्या पृष्टयार्थ वादी यांनी नि.क्र. ९२ वर शपथपत्र दाखल केले आहे. वादी यांनी निशाणी क्र. ९६ सोबत प्रतिवादी क्र. ४ यांचे मृत्यू

प्रमाणपत्र दाखल केलेले आहे. सदर मृत्यूप्रमाणपत्राचे अवलोकन करता प्रतिवादी क्र. ४ हे दि. १९/११/२०२४ रोजी मयत झाल्याचे स्पष्ट होत आहे. सदर दाव्यातील मागणी पाहता वादाचा विषय गुणदोषावर निर्गत होणे आवश्यक आहे. तसेच, सदर दाव्याचा संपूर्णपणे व कायम स्वरुपी न्यायनिर्णिय होणेकामी प्रतिवादी क्र. ०४ च्या वारसांना अभिलेखावर घेणे आवश्यक आहे. त्यासाठी, प्रतिवादी क्र. ०४ चे विरुध्द झालेला अबेटमेंन्ट आदेश रद्द करणे आवश्यक आहे. वादींनी प्रतिवादी क्र. ०४ चे वारस अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होण्यासाठी नि.क्र. ८९ वर अर्ज दाखल केला असून सदरचा अर्ज या न्यायालयाने आजरोजी मंजूर केला आहे. सबब, मी खालील आदेश पारीत करीत आहे,

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज वादींनी नि.क्र. ८९ वरील आदेशाची पुर्तता करण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

२. वादींनी नि.क्र. ८९ वरील आदेशाची पुर्तता केल्यानंतर प्रतिवादी क्र. ०४ चे विरुध्द झालेला अबेटमेंन्ट आदेश रद्द करण्यात येतो.

PRACHI RAVINDRA KULKARNI
Digitally signed by PRACHI RAVINDRA KULKARNI
Date: 2026.07.16 15:19:11 +0530

**( श्रीमती पी. आर. कुलकर्णी )**
सह दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर,
सांगोला.

दिनांक – १६/०७/२०२६

**प्रमाणपत्र**

मी खात्री देतो की, सदर आदेशाच्या / न्यायनिर्णयाच्या पीडीएफ फाईलमधील मजकूर हा मूळ आदेश / न्यायनिर्णयाप्रमाणेच शब्दशः आहे.

| | | |
|---|---|---|
| लघुलेखकाचे नाव | : | वि. अ. डांगे |
| न्यायालय | : | सह दिवाणी न्यायालय, क.स्तर, सांगोला. |
| आदेश / न्यायनिर्णयाचा दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| पिठासीन अधिकारी यांनी स्वाक्षरी केलेली दिनांक | : | १६/०७/२०२६ |
| निकाल अपलोड केलेले दिनांक | : | १६/०७/२०२६ |